**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात.**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१२७/२०२३
दिनांक-२४.०२.२०२५

**प्रति,**

१. पंडीतराव रामचंद्र गायकवाड
रा. मोकाशेवाडी,ता. जत, जि. सांगली .... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. आबासो विठठल गायकवाड
रा. मोकाशेवाडी, ता.जत, जि. सांगली ..... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**
**निकालपत्र**

मौजे. मोकाशेवाडी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर ०४ या मिळकती संदर्भात मंडळ अधिकारी शेगांव यांनी फेरफार नंबर १५१, दिनांक ३०.११.१९९६, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे आरटीएस अपील दाखल केलेले आहे.

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपिलकामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. अपिलार्थी यांनी दाखल केले अपिल अर्जाचे अवलोकन केले असता मौजे. मोकाशेवाडी, ता. जत, जि. सांगली येथील प्रकरणी दाखल केलेल फेरफार नंबर १५१, दिनांक ३०.११.१९९६, पहाता " खरेदी क्षेत्र प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी असलेने नोंद रद्द " असा शेरा ठेवून प्रस्तुतची नोंद नामंजूर केलेली आहे. यावर व्यथित होऊन, प्रस्तुत अपिलार्थी यांनी तब्बल २२ वर्ष १० महिने इतक्या अक्षम्य विलंबाने सदरचे अपील दाखल केलेचे दिसून येत आहे. मुलत: अपिलार्थी यांनी गट नंबर ०४ मधील ०.८५ हे.आर. क्षेत्रापैकी ०.११ हे.आर क्षेत्र खरेदी घेतले असलेबाबतचा उल्लेख करीत आहेत. परंतु, याकरिता झालेला व्यवहार त्यावेळी शासनाने ठरवून दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचा असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर सदर प्रमाणभूत क्षेत्राच्या खरेदी विक्री-विक्री व्यवहारापैकी संबंधीतांनी सक्षम प्राधिकारी यांची कोणतीही पूर्व परवानगी घेतलेची दिसून येत नाही. सदर वाद मिळकतीचे

खरेदी व्यवहारास महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम १९४७ चे तरतूदींची बाधा येते.

२. परंतू, अपिलार्थी यांना प्रस्तुत अपील दाखल करणेकामी इतका का विलंब झालेला आहे. याबाबत कोणताही कायदेशीर ऊहापोह अथवा कागदोपत्री पुरावा माझे-समोर आणीत नाहीत. त्याचबरोबर मा. सर्वोच्च न्यायालयाकडील देणेत आलेल्या वेगवेगळया आदेश प्रकरणी प्रत्येक दिवसागणीक विलंबाबातची कारणे पुराव्यानिशी नमूद करणे क्रमप्राप्त असताना अशी कोणतीही बाब कारणमिमांसासहीत माझे निदर्शनास आणीत नाहीत. केवळ नोंदणीकृत दस्त आहे व तो आज-अखेर कोणत्याही न्यायालयाने रद्दबादल ठरविलेला नाही. या उपरोक्त बाबीचा आधार घेऊन नोंद मंजूर करणेची विनंती करीत आहेत. वरील सर्व उपरोक्त वस्तुस्थीती व दाखल कागदपत्रे यांचा एकत्रीत सारासार विचार करता अपिलार्थी यांचे दाखल अपील हे कायदेशीरदृष्टया या न्यायालयात टिकणार नसलेचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचा प्रस्तुत अपील अर्ज हा विलंब माफीच्या मुद्दयावरच फेटाळणे आवश्यक असलेबाबतचे माझे मत झालेने मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**निकालपत्रातील नमूद कारणास्तव अपिलार्थीचे अपील विलंब माफीच्या मुद्दयावर फेटाळण्यात येत आहे.**

खर्चासंबंधी कोणेतेही आदेश नाहीत.

सदर निकालाची समज सर्व संबंधिताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

उप विभागीय अधिकारी ★ जत उपविभाग, जत ★

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण - जत
दिनांक -२४.०२.२०२५

प्रत-तहसिलदार जत यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.